**<u>नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. ७/२०१८ (श्री. भाऊ साबाजी लोट वगैरे– पुनर्वादी वि. श्री. दिलीप काशिराम सावंत वगैरे–उत्तरवादी) मधील नि. १६ वरील आदेश.</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी पुनर्वादीक्र. १– भाऊ साबाजी लोट हे दि. २३/११/२०१९ रोजी मयत झाल्यामुळे त्यांचे वारसदार श्रीमती सुमती भाऊ लोट, कु. शोभा भाऊ लोट, श्री. बाळाजी भाऊ लोट, श्री. अनिल भाऊ लोट, सौ. कामिनी देवदत्त देसाई, श्री. सुनिल भाऊ लोट, श्री. प्रमोद भाऊ लोट आणि श्री. समिर भाऊ लोट यांची नांवे पुनर्वादाकामी दाखल करुन घेणेकामी केलेला आहे.

२. प्रस्तुत प्रकरणात उत्तरवादी क्र. १, ४, १६, १८ व १९ यांना नोटीस बजावणी होवूनही ते हजर न झाल्यामुळे उत्तरवादी क्र. १ यांचेविरुध्द दि. १९/०६/२०१९ रोजी आणि उत्तरवादी क्र. ४, १६, १८ व १९ यांचेविरुध्द दि. २७/०३/२०१९ रोजीचे आदेशान्वये एकतर्फी सुनावणीचा आदेश झाला आहे. तसेच उत्तरवादी क्र. ८, १३,१४,१७ व २० ते २२ यांचेविरुध्द सदरहू प्रकरण खारीज करणेत आले आहे. सदरहू अर्जास उर्वरीत उत्तरवादींनी म्हणणे न दिल्यामुळे त्यांचेविरुध्द दि. २०/०१/२०२१ रोजी 'म्हणणे नाही' असा आदेश पारीत केला आहे. सदरचा आदेश रद्द न करुन घेतल्यामुळे अंमलात आहे. सदरहू अर्जदारांनी पुनर्वादी क्र. १– भाऊ साबाजी लोट यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची मूळ प्रत– नि. १९ अभिलेखावर दाखल केली असून, त्यानुसार दि. २३/११/२०१९ रोजी पुनर्वादी क्र. १– भाऊ साबाजी लोट हे मयत झाल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे आज रोजी सदरहू पुनर्वादीच्या वर नमूद वारसांची नांवे पुनर्वादी क्र. १– भाऊ साबाजी लोट यांचे वारसदार म्हणून अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब आदेश.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदारांचा पुनर्वादी क्र. १ चे वारस म्हणून त्यांची नांवे पुनर्वादात समाविष्ट करण्याचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार श्रीमती सुमती भाऊ लोट, कु. शोभा भाऊ लोट, श्री. बाळाजी भाऊ लोट, श्री. अनिल भाऊ लोट, सौ. कामिनी देवदत्त देसाई, श्री.

सुनिल भाऊ लोट, श्री. प्रमोद भाऊ लोट आणि श्री. समिर भाऊ लोट यांची नांवे पुनर्वादी क्र. १ चे वारसदार म्हणून प्रस्तुतचे पुनर्वादात समाविष्ट करण्यात येत असून, त्याप्रमाणे अर्जदारांनी पुनर्वादपत्रात योग्य ती दुरुस्ती विहीत मुदतीत करावी.

३. येणेप्रमाणे सदर अर्ज निकाली करणेत येत आहे.

(शि. व. हांडे)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
सिंधुदुर्ग—ओरोस.

दिनांकः– १४/०७/२०२२.